# हँग ग्लायडिंग : एक रोमहर्षक अनुभव



हँग ग्लायडिंग म्हणजे पक्ष्यासारखे हवेत उडणे. असे पक्ष्यासारखे हवेत उडत सॅन फॅन्सिसको परिसराची निसर्गरम्यता आकंठ अनुभवण्यासाठी आम्ही ८ जून २००८ रोजी 'माउंट टॅमलपेस स्टिन्सन बीच'वर गेलो. पण हवा स्वच्छ असूनही पाच जणांच्या ऐवजी मी आणि हे असे आम्ही दोघेच हँग ग्लायडिंग करू शकलो. माझे वय ५८ आणि त्यांचे ५९. त्यामुळे घरातल्या सगळ्यांनाच भीतीही वाटत होती आणि कौतुकही वाटत होते. असे असूनही त्यांच्या आग्रहामुळे आणि प्रोत्साहनामुळेच आम्ही या साहसी खेळाचा अनुभव घेऊ शकालो.

हँग ग्लायडिंग हा एक चित्तथरारक व रोमहर्षक असा करमणुकीचा खेळ आहे. ग्लायडर म्हणजे पक्ष्याच्या पंखासारखे पसरून ठेवलेले कापड. त्या कापडाच्या मधून मधून लोखंडी सळया घालून ते कापड पसरवून ठेवतात. एका लहान लोखंडी चौकटीच्या आधाराने हे पंख पसरलेल्या अवस्थेत राहतात. त्या चौकटीत एका हँगरला आपल्या प्रशिक्षकासह आपण स्वत:ला हँग करायचे व ग्लायडिंग करायचे, म्हणून 'हँग ग्लायडिंग.' आपण स्वत:ला प्रशिक्षकाशी दोन हुकनी जखडून घ्यायचे व पालथे टांगून घेऊन कापडी पंखांच्या मदतीने पक्ष्याप्रमाणे उंच उडत सृष्टिसौदर्याचा आस्वाद घेणे म्हणजे हँग ग्लायडिंग. उंच उडणा-या पक्ष्याला वरून कसे दिसते याचा अनुभव घेण्याच्या हेतूने हँग ग्लायडिंगची कल्पना साकार झाली आणि एक चित्तथरारक व रोमहर्षक खेळाचा जन्म झाला.

हँग ग्लायडिंग हा प्रकार आमच्या नातेवाईकांत व घरात आम्हीच पहिल्यांदा करणार होतो. या मे मध्ये घरातले सगळे आवरून सॅन फॅन्सिसकोला गेलो. आम्ही पाच जणांनी ग्लायडिंग करायचे ठरवले होते पण इतके धुके होते की त्या दिवशी ग्लायडिंग होऊ शकले नाही. वास्तविक आमच्या प्रशिक्षकाने हवा स्वच्छ होण्याची आणि लख्ख सूर्यप्रकाश पडण्याची बरीच वाट पाहिली. आमचा प्रशिक्षक या क्षेत्रात खूप अनुभवी होता. म्हणून त्याच्या कल्पनेनुसार दुपारी एक वाजेपर्यंत छान सूर्यप्रकाश पडू शकेल आणि आपण ग्लायडिंग करू शकू. पण त्याचा हा अंदाज चुकला. त्या दिवशी हवा तशीच धुक्याची राहिली आणि आम्ही ग्लायडिंग करू शकालो नाही. त्यामुळे निराश होऊन घरी परत आलो. तशी सॅन फॅन्सिसकोची हवा ब-याचदा ढगाळ आणि धुक्याने भरलेली असते. अनिश्चित असते. हे माहित असूनही आम्ही सॅन फॅन्सिसकोजवळील 'माउंट टॅमलपेस स्टिन्सन बीच'वर (Mt.Tamalpais

Stinson Beach) ग्लायडिंग करायचा विचार केला; कारण हँग ग्लायडिंग करताना त्या परिसराची रमणीयता याची देही याची डोळा आम्हाला अनुभवता यावी.

प्रशांत महासागराचा रम्य व विस्तीर्ण किनारा, महासागराचे निळेशार पाणी, किना-याच्या बाजूनेच असलेले उंच उंच डोंगर, डोंगरांवरच्या हिरव्या गर्द सूचिपर्ण वृक्षांची दाटी, विविध जातींच्या वृक्षराजींनी भरलेल्या डोंगराच्या घळ्या, डोंगरमाथ्यावर आणि जागोजागी वाळून पिवळेधमक झालेले गवत, अशा डोंगरावरून नागमोडी वळणे घेत गेलेला काळा कुळकुळित गुळगुळित सुंदर डांबरी रस्ता, त्या रस्त्यावरून मधूनच धावणा-या रंगी बेरंगी मोहक व आलिशान मोटारी, थंड, उत्साही, हवी हवी वाटणारी सुखद गार हवा अशा आल्हाददायक, निसर्गरम्य आणि नयनरम्य परिसराचे विहंगमावलोकन करण्याची खरी लज्जत आहे ती या सॅन.फॅन्सिसकोच्या परिसरावर खग बनून संथ गतीने उडण्यात. हे लक्षात घेऊनच आम्ही अनिश्चित हवामान असलेल्या सॅन.फॅन्सिसको परिसराची हँग ग्लायलडिंगसाठी निवड केली होती.



अमेरिकेच्या कॅलिफोर्निया राज्यातील 'सॅन होजे' (San Jose) या शहरात आम्ही राहतो. आमच्या घरापासून हँग ग्लायडिंगचे ठिकाण किमान साठ किलो मिटर आहे. मी, हे म्हणजे अरुण प्रभुणे, मोठा मुलगा उदय, मोठी सून प्रज्ञा, धकटा मुलगा सत्यव्रत, धाकटी सून श्रुती आणि तिन्ही नातवंडांसह आम्ही 'माउंट टॅमलपेस स्टिन्सन बीच'वर पोहोचलो. उदय, प्रज्ञा आणि आमची नातवंडे रेवा व रवी खाली किना-यावर राहिले. आम्हाला आकाशात पक्ष्याप्रमाणे उडताना पाहायला. पक्ष्याप्रमाणे आकाशातून झेप घेऊन महासागरकिनारी उतरताना पाहायला. आमचे फोटो काढायला. या वयातले आमचे कौतुक बघायला. कौतुक करायला.

मी, हे, आमचा प्रशिक्षक, सत्यव्रत, श्रुती आणि नातू तेजस महासागराजवळ असलेल्या डोंगरावर गेलो. हे अंतर किमान दहा किलो मिटर आहे. तिथे गेल्यावर प्रशिक्षकाने त्याच्या जवळ असलेल्या साहित्याची सराईतपणे हवी तशी नीट जुळवाजुळव करून ग्लायडरचे कापडी पंख पसरवून ग्लायडरची व्यवस्थित उभारणी केली. त्याला उडण्यास सज्ज केले. मग तो मला उडण्यासाठी सज्ज करू लागला. त्यांच्या आधी उडायला मी उतावीळ झाले होते. कारण मला नेहमीच असे चित्तथरारक प्रकार करायला खूपच आवडतात. त्यामुळे नेहमीप्रमाणे मीच पुढे होते. त्या प्रशिक्षकाने मला कोणता ड्रेस घालायचा, कसे त्याच्या बरोबर पळायचे ते सांगितले.

ग्लायडिंगसाठी विशिष्ट असा खास ड्रेस असतो. त्या ड्रेसवर पालथे पडून उडायचे असते. प्रशिक्षकाने मग मला ग्लायडिंगच्या ड्रेसमध्ये अडकवायला सुरुवात केली. आधी माझे दोन्ही पाय त्यात ओवले. काहीशा जाड असलेले माझे शरीर वेडेवाकडे वळण्यास कुरकुर करू लागले. ७२ किलो वजन

असल्यामुळे अर्थात शेवटी मी त्यात कोंबून शिरले . नंतर गुडघ्याला लागू नये म्हणून तिथे पॅड्स बांधले . डोक्यावर हेल्मेट घातले . एकूण आमचा अवतार मग चांद्रवीरासारखा दिसू लागला .



प्रशिक्षकही माझ्या प्रमाणेच तयार झाला . मग त्याला धरून त्याच्या जोडीने माझी पळायची प्रॅक्टिस झाली . मन माझे आनंदात होते . पळायची प्रॅक्टिस सपाट जागेवर झाली होती . पण नंतर त्याने डोंगराच्या उतारावरून जोडीने कुठून पळायचे ते दाखवले . तो उतार पाहून मात्र मी नर्व्हस झाले . घाबरून गेले . वयाच्या मानाने उतारावरून एरवी चालतानाच मी घाबरत असल्याने आता काही आपले खरे नाही असे वाटले . असा ड्रेस, असे हेल्मेट घालून प्रशिक्षकाबरोबर जोडीने उतारावरून पळत पळत जाऊन डोंगराच्या २००० फूट उंचीच्या टोकावरून मला उडी मारण्याचे साहस करायचे होते . कशी का होईना मनाची तयारी केली . उडी मारल्यावर आम्ही हवेत तरंगू लागणार होतो ! १५ मिनिटे वर आकाशात उडणार होतो ! तरंगणार होतो ! तरंगत तरंगत महासागराच्या किना-यावर उतरणार होतो ! खाली किना-यावर मोठा मुलगा, सून, नात, नातू स्वागतासठी तयार होतेच . ते माझे उडतानाचे आणि उतरतानाचे फोटो काढणार होते . वरून तयार होतानाचे आणि उडी मारतानाचे फोटो धाकटा मुलगा आणि सून काढणार होते . शूटिंगही करणार होते . अशी सगळी जय्यत तयारी होती .

शेवटी तो क्षण आला . प्रशिक्षकाच्या ड्रेसला दोन हुक होते . त्यांत माझे दोन्ही हात घालून मी त्याच्याशी जखडले गेले आणि एक दोन तीन म्हणत उडी घेतली ! खरे म्हणजे उडी घेतली असे म्हणण्यापेक्षा आम्ही जमीन सोडली ! आणि काय म्हणता ? अहो, शरीराबरोबर माझे मनही आकाशात आनंदाने विहार करायला लागले ! हा अनुभव खरोखर प्रत्येकाने घेतलाच पाहिजे . आमच्या बरोबर एक घार उडत होती . तिच्या बरोबर आपणही उडत आहोत ही कल्पनाच रोमांच आणत होती . म्हणूनच तर हा खेळ चित्तथरारक आणि रोमहर्षक म्हटला जातो . मग त्या प्रशिक्षकाने हातातील कॅमे-याने आमचे आकाशात उडत असतांनाचे फोटो काढले . माझ्याशी बोलत बोलत त्याने आता महासागरावर आमचे ग्लायडर नेले . वर निळे आकाश, आकाशात हसणारा चंद्र, सोबत उडणारी घार, खाली अथांग पसरलेला निळाशार प्रशांत महासागर आणि उडणारी मी जणू पक्षीच ! खूप खूप छान अनुभव होता . अविस्मरणीय अनुभव होता . मन तरल करणारा, रोमांचित करणारा अनुभव होता .



पंधरा मिनिटांनी आम्ही हळू हळू खाली उतरू लागलो. मुलगा, सून, नात, नातू सगळे जोरजोरात ओरडून कौतुक करीत होते. स्वागत करीत होते. उतरताना आणि उतरल्यावर भरपूर फोटो काढीत होते. किना-यावरील इतरही लोकांनी येऊन येऊन माझे कौतुक करीत होते. 'ॲमेझिंग' असे म्हणत कौतुकभरल्या नजरेने माझ्याकडे बघत होते. मीही आनंदाने फुलून गेले होते.

प्रशिक्षकाने त्यांच्याशी बोलताना नंतर सांगितले, की हे हँग ग्लायडिंग करणा-या स्त्रिया अमेरिकेत ५% पेक्षाही संख्येने कमी आहेत ! त्यात आता मी असल्याने त्यांची आणि सगळ्यांचीच मान ताठ झाली होती. माझ्या प्रमाणेच नंतर त्यांनीही हँग ग्लायडिंग केले आणि असाच आनंद घेतला.

सौ. उषा प्रभुणे

Moon and Usha



Usha and Glider



Usha and Instructor





Usha in Hang Gliding Dress

© Usha Arun Prabhune